“शिवकालीन गडदुर्गावरील जलव्यवस्थापन : पुणे, सातारा, कोल्हापूर रायगड जिल्ह्यांमधील प्रमुख किल्ल्यांवरील जलव्यवस्थापनाचा ऐतिहासिक अभ्यास ”

स्वामी रामानंद तीर्थ महारावाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता सादर केलेला संशाधन आराखडा

संशोधक

श्री कृष्ण सुखदेव मुळे

एम.ए. (इतिहास), सेट, नेट

मार्गदर्शक

डॉ. मुटकुळे आर. आर.

इतिहास विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक

बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत जि. हिंगोली.

शिवकालीन गडदुर्गावरील जलव्यवस्थापन :

पुणे, सातारा, कोल्हापूर, रायगड जिल्ह्यांमधील प्रमुख किल्ल्यांवरील जलव्यवस्थापनाचा ऐतिहासिक अभ्यास.

प्रस्तावाना :

पाणी म्हणजे जीवन, मानवांना, प्राण्यांना तसेच वनस्पतींना आपली जीवनावश्यक कार्ये पुर्ण करण्यासाठी पाण्याची नितांत आवश्यकता असते. तसेच जीवनात इतर बाबींसाठी देखील पाण्याचे महत्त्व अनन्य साधारण आहे. पाणी वापरासाठी पाणी-साठवणुक व पाणी- वितरण व्यवस्था गरजेची आहे.

भारतात अगदी सिंधु संस्कृतीपासून पाणी व्यवस्थापनाचे शास्त्र अवगत आहे. आपली आजची आड ही पाणी साठवणूक रचना सिंधु संस्कृतीची देणगी मानली जाते. चंद्रगुप्त मौर्याच्या काळातील पाणी व्यवस्थापनाबाबत कौटिल्याने अर्थशास्त्र या ग्रंथात लिहुन ठेवले आहे.

गुप्तकालीन शास्त्रज्ञ वराहमिहीर याने पाणी कसे शोधावे व त्याचे योग्य नियोजन कसे करावे याबाबत लिहुन ठेवले आहे. पुढे राष्ट्रकुटांच्या काळातही पाणी व्यवस्थापनावर विशेष लक्ष दिले गेलेले आढळते. याचा पुरावा म्हणजे कंधार तालुक्यातील जलतुंग समुद्र (तलाव) राष्ट्रकुटांच्या काळातील आहे.

मध्ययुगीन महाराष्ट्रात वार्षिक कमी पर्जन्यमान परिस्थितीमुळे तसेच भौगोलिक प्रतिकूल परिस्थितीमुळे पारंपारिक पाणी व्यवस्थापनाच्या उत्तम पद्धती विकसीत झालेल्या आढळतात. लिळाचरित्रातील तेराव्या शतकातील महाराष्ट्रात असणाऱ्या विहीरींची व पाणी वितरणाची पद्धत यांच्या नोंदी सदर गोष्टीची पुष्टी करतात.

महाराष्ट्रातील शिवकालीन गडकिल्ले अभेद्य राहण्यामागे तेथील पुरेसे व सक्षम पाण्याचे स्त्रोत हा घटक महत्त्वाचा मानला जातो. ग. ह. खरे आपल्या आज्ञापत्र या

पुस्तकात म्हणतात की, किल्ल बांधावा उदक (पाणी) पाहुनी यावरून गडदुर्गावरील पाणी व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखीत होते. मात्र शिवकालीन प्रमुख किल्ल्यांवरील पाण्याचा स्वतंत्रपणे शास्त्रीय अभ्यास काहिसा दुर्लक्षितच राहिला आहे. तसेच शिवकालीन विविध गडदुर्गावरील जल व्यवस्थापनाचा तुलनात्मक अभ्यासही काहींसा दुर्लक्षितच भाग म्हणावा लागेल.

या कारणास्तव मध्ययुगीन महाराष्ट्रचे जल व्यवस्थापन ढोबळमानाने अभ्यासून शिवकालीन प्रमुख किल्ल्यांचे जल व्यवस्थापन अभ्यासणे गरजेचे वाटते.

शिवकालीन किल्ले प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रात व कोकणात विखुरलेले आहेत. त्यामुळे पुणे, सातारा, रायगड, कोल्हापूर आदि जिल्ह्यांमधील राजगड, तोरणा, पुरंदर, तिकोना, रायगड, पन्हाळगड, प्रतापगड इत्यादी किल्ले अभ्यासासाठी निवडलेले आहेत. या किल्ल्यावरील फक्त जलव्यवस्थापनाचा अभ्यास तोही शास्त्रीय पद्धतीने काहिसा दुर्लक्षीतच राहिला आहे. त्यामुळे या किल्यांवरील जल व्यवस्थापनाचा शास्त्रीय अभ्यास होणे आवश्यक आहे.

या अभ्यासामुळे शिवकालीन पाणी व्यवस्थानाची प्रादेशिक वैशिष्ट्ये स्पष्ट होतील. या प्रमुख किल्ल्यावरील जल व्यवस्थापानाचा तुलनात्मक अभ्यास करून त्यांच्यतील साधर्म्य व फरक यांचा आराखडा बनविणे सोपे होईल. याद्वारे आजच्या भेटसावत असलेल्या पाणी प्रश्नांवर काही उपाय सुचविता येतील का याचा पण शोध घेणे शक्य होईल.

विषय निवडमार्गची भूमिका :

महाराष्ट्रातील शिवकालीन गडदुर्गांचा अभ्यास करताना या दुर्गांवरील पाणी व्यवस्थापनाचे महत्व प्रकर्षाने जाणवले. शिवकालीन गडदुर्ग पश्चिम महाराष्ट्रात तसेच कोकणात विखुरलेले असल्याने त्यांच्यात भौगोलिक तसेच भुगर्भिय वैविध्य आढळते. सहाजिकच मग या गडदुर्गांवरील पाणी व्यवस्थापनातही वैविध्यपुर्ण वैशिष्ट्ये आढळतात. या जल-व्यवस्थापन पद्धतींचा शास्त्रीय अभ्यास करून त्यांच्यामधील साधर्म्य व फरक शोधुन एक तुलनात्मक आराखडा बनविणे आवश्यक वाटले. या तुलनात्मक अभ्यासांती आजच्या पाणी समस्येवर काही उपाय सुचविता येतील का? हे पण या संधोधनातून पाहणे आवश्यक वाटले. या दृष्टीकोनातुन प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडण्याचे योजिले आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) मध्ययुगीन महाराष्ट्रातील पारंपारिक पाणी-व्यवस्थापनाच्या पद्धतींचा आढावा घेणे.

२) प्रस्तावित शिवकालीन प्रमुख्य किल्ल्यांचे जल-व्यवस्थापन शास्त्रीय पद्धतीने अभ्यासणे व त्या पद्धतींचा तुलनात्मक आराखडा बनविणे.

३) तुलनात्मक अभ्यासाठी आजच्या पाणी समस्येवर शक्य असल्यास उपाय सुचविणे.

संशोधनाची गरज :

महाराष्ट्राच्या प्रतिकूल पर्जन्य परिस्थितीतसुद्धा शिवकालीन गडकोटांवर उत्कृष्ट पाण्याची साठवणूक पद्धती व वितरण पद्धती आढळते. मात्र या विविध प्रकारच्या पाणी व्यवस्थापनाच्या संरचनांची व वितरण व्यवस्थांची तुलनात्मक वैशिष्ट्ये दुर्लक्षीत राहील आहेत. त्यांच्यावर शास्त्रीय पद्धतीने अभ्यास होणे आवश्यक आहे. या विविध किल्ल्यांवरील जलस्त्रोतांचे संरचनेनुसार व वापर पद्धतींनुसार वर्गीकरण होणे आवश्यक आहे. तुलनात्मक अभ्यासासाठी काही वैशिष्ट्ये आजघडीच्या पाणी समस्येवर उपाय ठरू शकतील का याचा शोध घेणे आवश्यक आहे.

विषयाची व्याप्ती :

महाराष्ट्राच्या जल-व्यवस्थापनाच्या इतिहासात गडदुर्गांवरील जलव्यवस्थापनाचे विशेष स्थान आहे. त्याचे कारण म्हणजे या गडदुर्गांची समुद्रसपाटीपासूनची उंची शिवकालीन कालखंडाचा म्हणजे साधारणातः सतराव्या शतकाचा काळ संशोधनासाठी निश्चित केला आहे. तसेच शिवकालीन प्रमुख किल्ले पश्चिम महाराष्ट्रत जास्त विखुरलेले असल्यामुळे पुणे, सातारा, कोल्हापुर, रायगड या चार जिल्ह्यांचा संशोधनासाठी विचार केला आहे. या जिल्ह्यांमधील काही प्रमुख किल्लेच संशोधनासाठी निवडले आहेत. ते खालील प्रमाणे आहेत.

पुणे जिल्ही : पुरंदर, तोरणा, राजगड, सिंहगड, लोहगड, शिवनेरी, तुंग, तिकोणा.

सातारा जिल्हा : प्रतापगड, अजिंक्यातारा, सज्जनगड, वासोटा

कोल्हापूर सजिल्हा : विशाळगड, पन्हाळगड

रायगड जिल्हा : रायगड

विषयाची मर्यादा :

१) प्रस्तुत संशोधन हे फक्त किल्ल्यांवरील जल - व्यवस्थापना पुरतेच मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे फक्त शिवकालखंडातील म्हणजेच सतराव्या शतकातील कार्यरत गडदुर्गांपुरतेच मर्यादित आहे.

३) प्रस्तुत संशोधन हे पुणे, सातारा, रायगड, कोल्हापूर जिल्ह्यांमधील प्रमुख किल्ल्यांपुरतेच मर्यादित आहे.

गृहितके :

१) शिवकालीन प्रमुख किल्ल्यांमध्ये अत्यंत किफायतशीर व सक्षम पाणी व्यवस्थापन आढळून येते.

२) प्रादेशिक व भौगोलिक वैविध्यांमुळे विविध जिल्ह्यातील गडदुर्गांवर पाणी व्यवस्थापन पद्धतीत वैविध्य आढळते.

३) संदर्भीय गडदुर्गांचा बांधणीचा कालखंड व निर्माण करणारे राज्यकर्ते वेगवेगळे असल्यामुळे पाणी व्यवस्थापनाच्या संरचनांमध्ये वैविध्य आढळते.

संशोधन विषयाचा मागोवा :

मध्ययुगीन महाराष्ट्रातील पारंपारिक जल व्यवस्थापनाच्या पद्धती यावर डॉ. द. म. मोरे, अनुराधा रानडे, अजीत वर्तक, डॉ. अरूण पाठक आदिंनी संशोधन केले आहे. तसेच गडदुर्गांवरील स्थापत्य संरचनांवर डॉ. सचिन जोशी, प्र. कें. घाणेकर आदिंनी संशोधन केले आहे.

संशोधनाची कार्यपद्धती व तंत्रे :

क्षेत्रिय भेटी, निरीक्षणे, मुलाखती, छायाचित्रणे

१) प्रत्यक्ष गडकोटांना भेटी देऊन पाणी व्यवस्थापनाच्या संरचनांचा अभ्यास करणे व निरिक्षणे, मोजमापे नोंदविणे.

२) गडकिल्ल्यांचा अभ्यास असलेल्या मान्यवरांच्या मुलाखती घेणे.

३) संशोधनाचे दृष्य स्वरुपात आकलन होण्यासाठी पाणी व्यवस्थापनाच्या संरचनांचे छायाचित्रणे घेणे.

प्रकरण योजना :

प्रकरण १ : प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, विषय निवडण्यामागची भूमिका, संशोधन उद्दिष्ट्ये, संशोधनाची गरज, विषयाची व्याप्ती व मर्यादा, गृहितके, संशोधन विषयाचा मागोवा, प्रकरण योजना, संशोधनाची कार्यपद्धती, संदर्भसूची इत्यादी बाबींचा समावेश केला जाणार आहे.

प्रकरण २ : मध्ययुगीन महाराष्ट्रातील विशेषतः गडदुर्गांवरील जलव्यवस्थापनाचा इतिहास

प्रस्तुत प्रकरणात मध्ययुगीन महाराष्ट्रातील पारंपारिक पाणी व्यवस्थापनाचा अभ्यास, यादवकालीन गडदुर्गांवरील पाणी व्यवस्थापनाचा अभ्यास, बहामनी साम्राज्यातील किल्ल्यांमधील पाणी व्यवस्थापनांचा थोडक्यात आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण ३ : पुणे जिल्ह्यातील प्रमुख किल्ल्यांचे जल-व्यवस्थापन.

प्रस्तुत प्रकरणात पुणे जिल्ह्यातील पुरंदर, तोरणा, राजगड, सिंहगड लोहगड, शिवनेरी, तुंग, तिकोणा आदि प्रमुख किल्ल्यांवरील पाणी व्यवस्थापनाच्या शास्त्रीय अभ्यासाचा समावेश केला जाणार आहे.

प्रकरण ४ : सातारा जिल्ह्यातील प्रमुख किल्ल्यांचे जल-व्यवस्थापन.

प्रस्तुत प्रकरणात सातारा जिल्ह्यातील प्रतापगड, अजिंक्यातारा, वासोटा, सज्जनगड आदि प्रमुख किल्ल्यांवरील पाणी व्यवस्थापनाचा शास्त्रीय अभ्यास मांडला जाणार आहे.

प्रकरण ५ : कोल्हापुर जिल्ह्यातील प्रमुख किल्ल्यांचे जल-व्यवस्थापन.

प्रस्तुत प्रकरणात कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळगड, विशाळगड आदि प्रमुख किल्ल्यांवरील पाणी व्यवस्थापनाचा शास्त्रीय अभ्यास मांडला जाणार आहे.

प्रकरण ६ : रायगड जिल्ह्यातील प्रमुख किल्ल्यांचे जल-व्यवस्थापन.

प्रस्तुत प्रकरणात रायगड जिल्ह्यातील रायगड किल्ल्यावरील पाणी व्यवस्थानाच्या शास्त्रीय अभ्यास मांडला जाणार आहे.

प्रकरण ७ : अभ्यासलेल्या प्रमुख किल्ल्यांचा पाणी व्यवस्थापनाचा तुलनात्कम अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात आतापर्यंत अभ्यासलेल्या सर्व किल्ल्यांच्या पाणी व्यवस्थापनाचे साधर्म्य व फरक अभ्यासले जाणार आहेत आणि त्यांचा एक तुलनात्मक आराखडा बनविला जाणार आहे.

प्रकरण ८ : समारोप आणि निष्कर्ष.

संदर्भग्रंथ सूची :

१) आज्ञापत्र (मराठे शाहीतील राजनिती) : ले. जी. एच. खरे आणि एस. आर. भिडे मुद्रक - सिटी. बुकस्टॉल पुणे

२) दुर्गदुर्गेश्वर रायगड : ले. घाणेकर पी. के. मुद्रक - स्नेहल प्रकाशन पुणे

३) प्राचीन भारतीय दुर्गशास्त्र आणि हिंदवी कस्वराज्याच्या दोन राज्यधान्याः राजगड व रायगड- ले. मिलींद पराडकर मुद्रक- निलचंपा प्रकाशन पुणे

४) महाराष्ट्रातील गड आणि राजवाडे-लेखिका विमला पाटील.

५) मराठ्यांचा इतिहास खंड १, २, ३- ले. खरे जी. एच. आणि कुलकर्णी एस. आर. मुद्रक कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे

६) शिवछत्रपती : संकल्पीत शिवचरित्राची प्रस्तावाना, आराखडा व साधने-ले. त्रेंबक शेजवलकर मुद्रक -मराठा मंदिर प्रकशन, मुंबई

७) मराठ्यांच्या इतिहासाची साधने- ले.वि.का. राजवाडे

८) महाराष्ट्रातील बारव स्थापत्य- ले. अरूण पाठक मुद्रेकम मराठवाडा संशोधन मंडळ, लातुर

९) लिळाचरित्र पुर्वार्ध (पान क्रं. १७०), लिळाचरित्र उत्तरार्ध (पान क्रं. ४४४) -ले. कोलते व्ही. बी.

१०) मराठा रियासत खंड १-ले. सरदेसाई गोविंद सखाराम मुद्रक-पॉप्युलर प्रकाशन मुंबई

११) छत्रपती शिवजी महाराजांची पत्रे -ले. देशपांडे प्र.नु. मुदक-सुषमा प्रकाशन धुळे

१२) शिवकालीन महाराष्ट्र- ले. डॉ. कुलकर्णी अ. रा. मुद्रक -राजसंह प्रकाशन पुणे १९९३

१३) शिवराज्य व शिवकाल - ले.भावे वासुदेव कृष्ण मुद्रक-नारायण वासुदेव भावे पुणे १९९७

१४) मराठी सत्तेचा उदय- ले. डॉ. पवार जयसिंगराव भाऊसाहेब मुद्रक - निराली प्रकाशन पुणे १९९६

१५) Shivaji, the Grand Rebel - Dennis Kincaid- Rupa Publications, India

मार्गदर्शक

डॉ. मुटकळे आर. आर.
इतिहास विभाग प्रमुख
व सहयोगी प्राध्यापक
बहिर्जी स्मारक महाविद्यालय,
वसमत जि. हिंगोली

संशोधक

श्री मुळे श्रीकृष्ण सुखदेव
एम.ए. (इतिहास), सेट, नेट